# प्रथम भाषा : मराठी – इयत्ता : सातवी

ज्ञानसेवा तु साफल्यम्

## महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.

### प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

### शैक्षणिक प्रगती चाचणी : संकलित मूल्यमापन २ : २०१७–१८

### इयत्ता : सातवी – विषय : मराठी (लेखी)

**विद्यार्थ्याचे नाव :** ____________________ **हजेरी क्रमांक :** [ ]

**शाळेचे नाव :** ____________________ **तुकडी :** ________

**केंद्र :** ________ **ता.** ________ **जि.** ________ **दिनांक :** / /२०१८

| | लेखी | | | | | | | | | तोंडी | | प्राप्त गुण | | | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | मूलभूत क्षमता प्रश्न क्र. १ व १० | इयत्तेच्या क्षमता | एकूण | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १० | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १० | ५० | ६० | |

**प्र. १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ____________ २) ____________

३) ____________ ४) ____________

५) ____________ ६) ____________

७) ____________ ८) ____________

९) ____________ १०) ____________

**प्र. २.** खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

आज ३१ डिसेंबर. श्रुती जरा नाराजीनंच घरी आली. त्याचं कारणही तसंच होतं. वर्गात तिच्या मॅडमनी तिला नववर्षाचा संकल्प विचारला. इतरांपेक्षा वेगळा संकल्प सांगता न आल्यामुळे ती नाराज झाली. तशीच ती घरी आली आणि ताबडतोब आईबरोबर मावशीकडे गेली. मावशीकडे तिच्या मावसबहिणीचा वाढदिवस होता. झकास बेत होता. गुलाबजाम, केक, कचोरी आणि पुलाव. सगळंच श्रुतीच्या आवडीचं; पण तिनं एक गुलाबजाम खाल्ला अन् डिश बेसिनमध्ये ठेवून दिली.

मावशीनं ते बघितलं. श्रुती उपाशी राहील, म्हणून तिच्या आईच्या कानावर घातलं. घरी आल्यावर आई श्रुतीला खूप रागावली. 'खायच नव्हतं तर डिश मला का आणून दिली नाहीस?' वगैरे वगैरे. ''मला नाही त्यातलं काही आवडलं,'' श्रुती रागातच म्हणाली. एव्हाना बाबाही आले. तेही श्रुतीला रागावले आणि समजावलं सुद्धा.

खट्टू मनानं श्रुती खुर्चीत मान खाली घालून बसली होती. दूरदर्शनवर बातम्या सुरू होत्या. श्रुतीचे बाबा बातम्या ऐकत होते. श्रुतीनं सहज वर बघितलं. दूरदर्शनवर दाखवलेली मेळघाटमधील कुपोषित बालकं तिनं बघितली आणि लगेच विचारलं, ''बाबा ही बालकं अशी वाळलेली का आहेत हो?'' ''बेटा, त्यांना पुरेसं जेवण मिळत नाही, त्यामुळे प्रोटिन्स, व्हिटॅमिन, मिनरल्स त्यांना मिळत नाहीत, म्हणून ती अशी वाळलेली आहेत.'' बाबांनी सांगितलं.

**अ)** वर्गात मॅडमनी कशाबद्दल विचारले? योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर. (गुण १)

१) आवडीच्या पदार्थाबद्दल २) वाढदिवसाबद्दल

३) नववर्षाच्या संकल्पाबद्दल

**ब)** श्रुतीच्या प्रश्नाला बाबांनी काय उत्तर दिले? (गुण २)

________________________________________

________________________________________

**क)** श्रुतीच्या बाबांनी श्रुतीला काय समजावले असेल? तुझे मत लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________

________________________________________

**प्र. ३.** खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना,
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना
संकटासही ठणकावून सांगावे, ये आता बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

**कवी – गुरू ठाकूर**

**अ)** कवीच्या मते आयुष्याला कसे उत्तर द्यावे? (गुण १)

**ब)** स्वप्नांची चैन करताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात? (गुण २)

**क)** 'यशोशिखराकडे वाटचाल करताना आपण नम्र असावे' हे कवितेतील कोणत्या ओळीवरून लक्षात येते? ती ओळ येथे लिही. (गुण २)

**प्र. ४.** खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

कीर्तन हे गाडगेबाबांचे खरे सामर्थ्य. आपल्या खेडवळ लाडक्या वऱ्हाडी बोलीमध्ये तासन् तास ते हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून ठेवत. काव्य आणि विनोद यांचा धबधबा त्यांच्या मुखातून वाहायचा. गरिबांचा आणि दलितांचा उद्धार हा एकच त्यांच्या कीर्तनाचा विषय. 'देवळात जाऊ नका. मूर्तीची पूजा करू नका. देवापुढे पैसा-फळे ठेवू नका. तीर्थयात्रेला जाऊ नका. सत्यनारायण पुजू नका. पोथीपुराणातल्या चमत्कारांवर विश्वास ठेवू नका. कोणाचा मंत्र नि गुरूपदेश घेऊ नका. प्राण्यांची हत्या करू नका. सावकाराचे कर्ज काढू नका. अडाणी राहू नका.' ही शिकवण सतत आयुष्यभर हजारो कीर्तने करून गाडगेबाबांनी जनतेला दिली.

गरिबांसाठी साऱ्या महाराष्ट्रात त्यांनी ठिकठिकाणी धर्मशाळा बांधल्या. या सर्व धर्मशाळांची व्यवस्था बाबांनी चोख आणि नमुनेदार ठेवली. बाबा म्हणजे खरोखर एक चमत्कार होता. त्यांच्या अंगामध्ये अनेक अलौकिक शक्ती होत्या, की ज्यांचे आकलन कोणालाही होऊ शकले नाही. 'रंजल्यागांजल्यांना 'आपुले' म्हणणारा आणि अनाथ आपंगितांना हृदयाशी धरणारा तो खरा साधू' ही तुकोबांची व्याख्या गाडगेबाबांना अक्षरश: लागू पडते. माणसामधल्या परमेश्वराची पूजा करणाऱ्या या संताने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात एक प्रचंड सामर्थ्य निर्माण केले.

**अ)** गाडगेबाबांचे खरे सामर्थ्य कशात होते? योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर. (गुण १)

१) भारूड २) कीर्तन ३) प्रवचन

**ब)** गाडगेबाबा कीर्तनातून कोणकोणते उपदेश करत असत? त्यांपैकी कोणतेही दोन उपदेश लिही. (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

**क)** तुकोबा कोणाला साधू म्हणत असत? ते लिही. (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

**प्र. ५.** खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

लहानपणी काही काळ मला दाढी आणि मिश्या, या दोन्ही गोष्टींची प्रचंड भीती वाटायची. हा एखादा रोग वगैरे आहे असा माझा समज झाला होता की काय कोण जाणे! बायकांना ह्या रोगाची लागण होत नाही, हेदेखील माझ्या चिमुकल्या मेंदूत नोंदवले गेले असावे. त्यामुळे एकंदरीत मी मुलीबाळींमध्येच जास्त रमत असे. वाईटातून चांगले निघते म्हणतात, ते असे.

आमच्या घरात माझ्याखेरीज आणखी दोन पुरुष होते. माझा बाबा आणि माझा दादा. पैकी बाबा मला खूपच आवडायचा. पण एकदा त्याला गालगुंड झाले होते, म्हणून काही दिवस त्याने दाढी केली नव्हती. तेव्हा मी घाबरून त्याच्याजवळ जाण्याचेच टाळत होतो, असे आई सांगते.

दादाचे मात्र माझ्या उलट होते. संधी मिळेल तेव्हा तो स्वत:ला आणि दिसेल त्या चित्राला किंवा फोटोला दाढी-मिश्या काढून ठेवत असे. माझ्या सगळ्या पुस्तकांमधली छान छान चित्रे त्याने अशी बरबटली होती. या केसाळ 'रोगा'ची मी धास्ती घेण्याचे हेही कारण होते.

**अ)** लहानपणी लेखकाला कोणत्या गोष्टींची भीती वाटायची? (गुण १)
योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर.

१) केस व मिश्या   २) दाढी व डोळे   ३) दाढी आणि मिश्या

**ब)** लेखक व दादा यांच्यात काय फरक होता? (गुण २)

________________________________________

________________________________________

________________________________________

**क)** लेखक मुलीबाळींमध्येच जास्त का रमत? (गुण २)

________________________________________

________________________________________

________________________________________

**प्र. ६.** खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.

**अ)** खालील चौकटीतील अक्षरांपासून कोणत्याही दोन म्हणी तयार करून लिही. (गुण २)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क | रा | वे | ती | न | च |
| अ | प | ळ | सा | ला | मा |
| ति | ते | थे | त | से | ती |
| स | पा | ने | भ | रा | वे |

१) ______________________________

२) ______________________________

**ब)** खाली दिलेल्या वाक्यातील क्रियाविशेषण ओळखून लिही. (गुण १)

सायकलचे चाक सावकाश फिरू लागले.

क्रियाविशेषण : ______________________________

**क)** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे सामान्यरूप लिही. (गुण १)

मुले मैदानात खेळत होती.

सामान्यरूप : ______________________________


**ड)** खालील वाक्य वाच. योग्य तेथे विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

आई म्हणाली, ''दोन्ही घे पण लवकर आवर कारण जोराचा पाऊस सुरू होईल.''


______________________________

______________________________

**इ)** खालील वाक्यांचे प्रकार ओळखून त्याखालील रिकाम्या चौकटीत लिही. (गुण २)




**फ)** कंसातील शब्दांचे तत्सम व तद्भव असे वर्गीकरण करून रिकाम्या चौकटीत लिही.
(कन्या, कोवळा, कर, पान) (गुण २)




**ग)** अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळख. (गुण १)
आम्ही <u>पुण्याहून</u> मुंबईला रेल्वेने गेलो.

---

**प्र. ७.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही. (गुण ५)

रेश्मा तिच्या आजीला मोबाईलविषयी समजावून सांगत आहे. तेव्हा त्या दोघींमध्ये काय संवाद झाला असेल? तो येथे लिही.

**प्र. ८.** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना करून तुझ्या शब्दात लिही. (गुण ५)

१) झाड बोलू लागले तर....

२) मी रोबोट झालो तर...

३) मी मुख्याध्यापक झालो तर...

**प्र. ९.** तुझी मैत्रीण मनिषाने 'बेटी बचाओ' या विषयावरील जिल्हास्तरीय भाषण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्याबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिही. (गुण ५)

■■■